# महाराष्ट्र विधानसभा

**पाचवे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: ८४, रूपये:- २९,३८,७८,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (१) | ४ | १० | मुंबईतील बहुतांश पोलीस वसाहतींची दुरवस्था झाली असणे, या पोलीस वसाहतींची दुरुस्ती लवकरात लवकर होणे गरजेचे असणे, या पोलीस वसाहतींमध्ये राहणाऱ्या पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना असणे, या पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासाची मागणी पुढे येणे,अश्या पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी किंवा पुनर्विकासासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९४, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (२) | २७ | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड व मालेगाव तालुक्यातील राज्यमार्ग व प्रजिमा ची दुरावस्था झालेली असून या मार्गाची सुधारणा करण्याची आवश्यकता असणे, यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (३) | ३५ | १० | पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रा अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र. 11 मधील गोरेवाडा तलाव ते पिटेसुर या मार्गाचे तसेच दिनशा फॅक्टरी चौक बोरगाव ते गोरेवाडा चौक व गोरेवाडा वस्ती ते झिंगाबाई टाकळी टॉवर लाईन रोड या रस्त्यांवरुन दैनंदीन हजारो नागरीकांचे वाहतुक असुन या रस्त्यांवर वांरवार जागो जागी खडे पडत असल्यामुळे नागरीकांना त्यावरुन वाहतुक करण्यास अत्यंत त्रास दायक होत असते. त्यामुळे सुचविलेल्या रस्त्यांचे सिमेंट रस्त्यात नुतनीकरण केल्यास नागररीकांना सोयीचे होईल. या कामा करीता निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ३६ | १० | पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रा अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र. 12 मधील दाभा वस्ती ते गुरुदत्त सोसायटी ते तेजस विदयालय खडगाव रोड या मार्गावरुन दैनंदीन हजारो नागरीकांचे वाहतुक असुन या रस्त्यांवर वांरवार जागो जागी खडे पडत असल्यामुळे नागरीकांना त्यावरुन वाहतुक करण्यास अत्यंत त्रास दायक होत असते. त्यामुळे सुचविलेल्या रस्त्यांचे सिमेंट रस्त्यात नुतनीकरण केल्यास नागररीकांना सोयीचे होईल. या कामा करीता निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (५) | २६ | १०० | श्री संत मुक्ताबाई पालखी मार्ग भूम- वारदवाडी-पापनस-वडसिंगे-माढा- उपळाई-बु शेटफळ-पंढरपूर असा आहे दरवर्षी सुमारे 2.50 लाख भाविक या रस्त्यांने ये- जा करत असणे, सदर मार्गावरील वर्दळ व वाहतूक वाढत असणे, सदरील रस्ता हा वारकऱ्यांच्या दिंडी करीता अपुरा पडत असणे, तसेच रस्त्याची दुरवस्था झाली असणे, या रस्त्याला राज्य महामार्गाचा दर्जा देऊन दुरुस्ती करण्याबाबत निधी उपलब्ध देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (६) | ३ | १० | उमरेड विधान सभा मतदार संघातील,उमरेड,भिवापूर, कुही या तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे त्यामुळे,त्या भागतील नागरिकांना व वाहन धारकांना अत्यंत जिक्रिचा सामना करावा लागत आहे त्यामुळे दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण अधिक वाढत आहे पर्यायाने नागरिक व वाहन धारकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे त्यामुळे शासनाकडून तात्काळ 1) भिवापूर - जवळी नांद - बेसूर रस्ता (रा.मा. 342) कि.मी. 18/00 ते 33/00 सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. ता. भिवापूर जि. नागपूर.2)भिवापूर - जवळी नांद - बेसूर रस्ता (रा.मा. 342) कि.मी. 0/00 ते 17/700 सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. ता. भिवापूर जि. नागपूर या रस्त्यांना प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९५, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (७) | १३ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील भिलवडी सुखवाडी रस्ता इजिमा क्र 117 रस्त्यावर पूलाच्या जोडरस्त्याचे काम प्रलंबित असून यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | १४ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खरसुंडी बलवडी पारे आळते चिखलगोठण आंधळी पलूस रस्ता प्र.जि.मा 26.कि.मी 42/950 ते 53/00 भाग - किमी 48/200 ते 49/200 पलूस गावामध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व आर.सी.सी गटार चे काम प्रलंबित असून यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १६ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील उरुण - इस्लामपूर - नवेखेड - जुनेखेड - पुणदी तर्फ वाळवा पलूस कॉलनी रा.मा. क्र.150 ला मिळणारा प्रजिमा क्र.36 रा. म. मा. 266 ते इबारा किमी 19/00 ते 21/200 काम प्रलंबित असून यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १७ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील वांगी, रामापूर, बांबवडे, येळावी ते रामा 142 ला जोडणारा रस्ता प्रजिमा क्र.19 किमी 9/900 येथे लहान पूलाचे बांधकाम करणे व 11/100आणि 19/900 येथे लहान पुलाचे बांधकाम करणे, यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १८ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील रा. मा. 142 ते तुपारी - घोगांव - पुणदी - नागराळे - आमणापूर - भिलवडी रस्ता प्रजिमा क्र. 32 किमी 0/00 ते 29/900 भाग-किमी 29/400 भिलवडी गावाजवळ सरळी नाल्यावर लहान पूलाचे बांधकाम करणे, यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | १९ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खरसुंडी बलवडी पारे आळते चिखलगोठण आंधळी पलूस रस्ता प्र.जि.मा 26 किमी 51/100 मध्ये लहान पूलाचे बांधकाम करणे. यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (१३) | १० | १० | नागपूर पश्चिम सिविल लाईन, रवी नगर, सेमिनरी हिल्स आणि लागत परिसर हे बांधकाम विभागाअंतर्गत येत असणे, बहुतांश रस्ते रुंदीकरण करण्याची गरज असून दोन्ही रस्त्याच्या बाजूला स्ट्रोम वॉटर ड्रेन व्यवस्था करुन पावसाचे पाणी निकासीत होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१४) | १२ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली क्षेत्रातील विर्शी फाटा ते विर्शी रस्ता (प्र.जि. मा.29) तसेच दिघोरी माठी ते खराशी रस्ता (ग्रा. मा 358) तसेच नॅसनल हॉयवे नं. 6 पिंपडगाव सडक ते पालांदुर - खराशी सस्ता अत्यंत खराब असुन रस्ता ब-यांच ठिकाणी दबलेला व उखरलेला असणे, मागील 3 वर्षापासुन अर्थसंकल्पीय निधीतुन कोणत्याच प्रकारचे काम झालेले नसणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१५) | ६ | १० | उमरेड, भिवापूर, कुही या तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झालेली असणे, त्यामुळे त्या भागतील नागरिकांना व वाहन धारकांना अडणीना सामना करावा लागत असणे, दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण अधिक वाढत असणे, पर्यायाने नागरिक व वाहन धारकांच्या जीवितास धोका निर्माण होत असणे, 1) चांपा,डव्हा खापरी रस्ता किमी.३३/०० ते ३९/४०० मध्ये दोन लहान पुलासह सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे,ता.उमरेड,जिल्हा नागपूर, 2) सुरगाव - मांगली उटी परसोडी फुकेस्वर किमी 8/00 ते 28/00 दोन लहान पुलाचे बांधकाम करणे, 3) परसोडी - नक्षी - भागेबोटी - कीन्हाळ! पेठरी कारगाव खैरगाव,सरांडी - पहामी - बोटेझरी खंडासरी,ते बेसुरी रस्त्याचे बांधकाम करणे (भाग सरांडी ते पाहमी)किमी.22/00 ते 26/00 तालुका भिवापूर जिल्हा नागपूर, 4)राष्ट्रीय महामार्ग 353 डी पासून गोडबोरी फाटा ते भागे बोरी, सेलोटी बोर्डेकला - पाठरबाणी धायनगाव टाका ते भोसी रस्त्यांची सीमा रस्ता व पुलाचे बांधकाम करणे, उपरोक्त रस्त्यांना प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०४, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१६) | ७ | १० | शासकीय विश्राम गृह कुही, शासकीय विश्राम गृह उमरेड, शासकीय विश्राम गृह भिवापूर जिल्हा नागपूर येथील विश्राम गृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असणे, सदर ठिकाण यावरील दुरुस्ती किंवा नूतनीकरण न केल्यामुळे लोकप्रतनिधीं तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी किंवा अभ्यांगत यांना प्रचंड गैरसोईचा सामना करावा लागणे, त्यामुळे शासनाने तातडीने उपरोक्त ठिकाणी सर्व शासकीय विश्राम गृह नूतनीकरणासाठी भरघोस निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११२, रूपये:- १,२९,१७,०००/-**<br>**श्री. गजानन लवटे** |
| (१७) | १ | १०० | दर्यापूर मतदार संघातील उप जिल्हा रुग्णालय, अंजनगाव सुर्जी यांचे 50 खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात आले असणे, या रुग्णालयातील वर्ग-3 व वर्ग-4 च्या कर्मचा-यांकरिता सदनिका बनविण्याचे प्रस्तावित करण्यात असणे, म्हणून त्याकरिता सुमारे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | 23 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असणे, परंतु अदयापही निधीची तरतूद करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १८ डिसेंबर, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर